नियोजन (रोजगार हमी योजना) विभागाकरिता कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ सेवा सीएससी - एसपीव्ही ई-गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड या केंद्रपुरस्कृत उपक्रमाद्वारे उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळ व्यवस्थापन धोरण.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-२०२०/प्र.क्र.७७/रोहयो-७**
१६ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २५ ऑगस्ट, २०२१

वाचा :-

१) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.०७/रोहयो १०अ- दि.१६ डिसेंबर, २०१०
२) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-२०२०/प्र.क्र.०४/रोहयो ३- दि.११ फेब्रुवारी, २०१३
३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- राज्य निधी असोसिएशनच्या राज्य नियामक मंडळाच्या (Governing Council) दिनांक २७ ऑगस्ट २०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
४) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-२०२०/प्र.क्र.३०/रोहयो- दि.११ नोव्हेंबर, २०२०.
५) सीएससी ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमिटेड,यांचे पत्र दि.२७ जुलै ,२०२१
६) शासन परिपत्रक क्रमांक: मग्रारो-२०२०/प्र.क्र.०५/रोहयो-७ दि. ४ ऑगस्ट, २०२१.

## परिपत्रक :-

नियोजन (रोजगार हमी योजना) विभागाच्या अधिनिस्त असलेली विविध कार्यालये जसे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपूर, मंत्रालय स्तर व विभांगातंर्गत इतर कार्यालयांमध्ये घेण्यात येणाऱ्या कंत्राटी मनुष्यबळाचा करिता उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ च्या शासन परिपत्रकानुसार सीएससी - एसपीव्ही ई-गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड संस्थेकडून मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकानुसार मनुष्य दिवस निर्मिती निहाय / जॉब कार्ड निहाय जिल्ह्यास मंजूर होणारे नवीन मनुष्यबळ कशा प्रकारे जिल्ह्यात उपलब्ध करून देण्यात यावे याबाबतच्या स्पष्ट सूचना ११ नोव्हेंबर २०२० रोजीच्या परिपत्रकात नसल्याबाबत अनेक जिल्ह्यांकडून याबाबत विचारणा करण्यात येत आहे. तसेच अशाप्रकारे उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या मनुष्यबळास अनुज्ञेय रजा, मनुष्यदिवस निर्मितीच्या आधारावर कंत्राटी कर्मचारी यांचे जिल्हा/तालुका मध्ये बदल करण्या संदर्भातील बाबी, विवक्षीत कारणास्तव सेवेतून काढून टाकणे, मनुष्यबळा करिता अपील (सुनावणी) इत्यादी बाबत निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

उपरोक्त सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

**१. कंत्राटी कर्मचा-यांची नियुक्ती :-**

नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकानुसार **सीएससी ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमिटेड** यांच्याकडून जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, नागपूर, मंत्रालय स्तर व विभांगातंर्गत इतर कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला मनुष्यबळास नियुक्त देण्याचे प्राधिकार हे शासनास राहतील.

**२. कंत्राटी पद्धतीने नवीन मनुष्यबळ उपलब्ध करून घेणे: -**

जिल्हयास मनुष्यदिवस, जॉब कार्ड निहाय बाबींमुळे नवीन मनुष्यबळ उपलब्ध करून घेणे आवश्यक असल्यास, त्यांनी सदर नवीन मनुष्यबळ मागणीचा प्रस्ताव सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** नुसार शासनास सादर करावा. तसेच कोणत्याही परिस्थितीत संबंधीत जिल्ह्याने नवीन मनुष्यबळ मागणीचा प्रस्ताव परस्पर **सीएससी ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमिटेड यांना सादर करू नये.**

**३. मनुष्यदिवस निर्मितीच्या प्रमाणे वा अन्य कारणास्तव कंत्राटी कर्मचा-यांची जिल्हा/ तालुक्यांच्या सेवेच्या ठिकाणांमध्ये बदल करणे:-**

नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रका नुसार सदर कंत्राटी सेवा उपलब्ध करुन घेताना शासनाची मान्यता आवश्यक असल्यामुळे जिल्हा तसेच तालुका स्तरावर कोणत्याही कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवांच्या ठिकाणांमध्ये बदल ही शासनाच्या मान्यतेशिवाय करण्यात येऊ नये.

तसेच, NREGASoft मधून उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या आधारावर शासन स्तरावरून वर्षातून एकदा सर्व मनुष्यबळाच्या आढावा घेऊन त्यांच्या योग्य ठिकाणी पुनर्स्थापना करेल. एखाद्या वेळी काही विशिष्ट कारणाने काही ठिकाणी अचानक मनुष्यबळाची आवश्यकता भासल्यास वर्षापेक्षा कमी वेळेत सुद्धा असे पुनर्स्थापना शासन करेल.

**४. कंत्राटी कर्मचा-यांना अनुज्ञेय रजा:-**

**सीएससी ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमिटेड** यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या मनुष्यबळास दर आठवडयात शनिवार व रविवार तसेच राष्ट्रीय सुट्टी वगळता खालीलप्रमाणे रजा अनुज्ञेय राहतील.

**अ) नैमित्तीक रजा :-**१२ दिवस (कंत्राटी कर्मचा-यास दरमाह १ दिवस नैमित्तीक रजा कोणत्याही उचित कारणास्तव अनुज्ञेय करण्यात येईल. सदरची रजा ही त्याच वर्षातील ३१ डिसेंबर पर्यंत अनुज्ञेय राहील.)

**ब) वैद्यकीय/अर्जित रजा :-** २० दिवस (कंत्राटी कर्मचा-यास वार्षिक २० दिवस रजा कोणत्याही उचित कारणास्तव अनुज्ञेय करण्यात येईल. सदरची रजा ही त्याच वर्षातील ३१ डिसेंबर पर्यंत अनुज्ञेय राहील.)

**क) कोवीड-१९ विशेष रजा :-**जे कंत्राटी कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह असल्यामुळे ते रुग्णालयात दाखल असल्यास रुग्णालयात दाखल केल्यापासून रुग्णालयातून डिस्चार्ज मिळेपर्यंत व

त्यानंतरचे ७ दिवस आणि उर्वरित कर्मचाऱ्यांना (घरी आयसोलेशन असलेले पॉझिटिव्ह कर्मचारी) कमाल १४ दिवस विशेष **भरपगारी** रजा मंजूर करण्यात येत आहे.

उपरोक्त रजा मंजूर करण्याकरिता लागणारी कागदपत्रे खालील प्रमाणे असतील:-

- **१४ दिवसाचे विशेष रजा मंजूर करण्यास आवश्यक कागदपत्रे :-**

  **१.** संबंधित विभाग/कार्यालय प्रमुख यांचे पत्र

  २.पॉझिटिव्ह असल्याचे RT-PCR / Antigen रिपोर्ट

- **१४ दिवसाचे व्यतिरिक्त ०७ दिवसाची रजा मंजूर करण्यास आवश्यक कागदपत्रे :-**

  १. संबंधित विभाग/कार्यालय प्रमुख यांचे पत्र.

  २. पॉझिटिव्ह असल्याचा RT-PCR / **Antigen** रिपोर्ट

  ३. वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक असेल.

**ड) प्रसूती रजा:-**

१. महिला कर्मचा-यांना १८० दिवसांची प्रसूती रजा अनुज्ञेय राहील.

२.सदरची रजा ही छोट्या कुटुंबांचा आदर्श लक्षात घेऊन केवळ दोन अपत्याच्या मर्यादेत मंजूर करण्यात येईल.

३. सदर प्रसूतीचा लाभ रोजगार हमी योजनेत मागील १२ महिन्यात कमीत कमी ८० दिवस काम केलेल्या महिला कर्मचाऱ्यास अनुज्ञेय होईल.

४. गर्भपात किंवा त्या संदर्भातील अन्य वैद्यकीय कारणास्तव ४५ दिवसांची रजा मंजूर कण्यात येईल.

५. नियमानुसार दत्तक घेतलेल्या मुलाच्या संगोपनाकरीता ९० दिवस रजा अनुज्ञेय होईल.

६. सक्षम वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र सदर महिला कर्मचा-याने रुजू होतेवेळी कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

**५. विवक्षीत कारणास्तव सेवेतून काढून टाकणे :-**

नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सदर कंत्राटी सेवा उपलब्ध करुन घेताना शासनाची मान्यता आवश्यक असल्यामुळे जिल्हा तसेच तालुका स्तरावर कोणत्याही कंत्राटी कर्मचा-यांस शासनाच्या मान्यतेशिवाय सेवेतून कमी करण्यात येऊ नये.

**५.१ खालील बाबतीत कंत्राटी कर्मचारी यांना शासनाच्या मान्यतेशिवाय तात्काळ प्रभावाने सेवेतून कमी करण्यात येईल.**

१. आर्थिक अपहार/गैरव्यवहार प्रकरण.

२. लाचलुचपत संबंधातील गुन्हा.

३. फौजदारी स्वरुपातील गुन्हा.

४. इतर कोणत्याही गंभीर गुन्हयात प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष सहभाग आढळल्यास.

५. इतर कोणत्याही कारणास्तव २४ तास अटकेत असल्यास.

वरील कारणे उद्भवल्यास कंत्राटी कर्मचारी ज्या कार्यक्रम अधिकारी यांच्या कार्यालयात सेवारत असतील ते कार्यक्रम अधिकारी सक्षम प्राधिकारी असतील.

**५.२ मनरेगाच्या कामात Performance कमी असणे:-**

मनरेगा मागणीवर आधारित(Demand Driven Scheme) योजना आहे. कामाची मागणी, मजुरांची मजुरी वेळेवर मिळणे, मागणी केलेल्या कामावर त्वरित काम मिळवून देणे, तसेच मंजूर काम गतीने होणे व पूर्णही होणे इत्यादी बाबींवर अवलंबून असते.

तसेच,यापुढील काळात Community Mobilization तसेच प्रशिक्षणावर भर देण्यात येणार आहे. जेणेकरून कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामा बाबतीत कौशल्य वाढीस लागेल. त्यांच्या सेवेची पातळी सुधारेल आणि गरजू लोकांकडून कामांची मागणी वाढेल.

या सर्व बाबींमध्ये **Performance** चा एकत्रित निर्देशांक मनुष्यदिवस निर्मिती असेल. वेळोवेळी शासन ठरवेल त्या सेवा निर्देशांकामध्ये एखादा कंत्राटी कर्मचारी कमी पडत असल्यास सदर कर्मचाऱ्यांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

**६. मनुष्यबळाकरिता अपील (सुनावणी) :-**

नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सदर कंत्राटी सेवा उपलब्ध करुन घेताना शासनाची मान्यता आवश्यक असल्यामुळे जिल्हा तसेच तालुका स्तरावर कोणत्याही एखाद्या कंत्राटी कर्मचा-यांस वरील बिंदू क्रमांक ५ अन्वये सदर कर्मचाऱ्यास कामावरून कमी करण्यात आल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यास शासनाकडे अपील करण्याचा अधिकार राहील.

**७. भविष्य निधी लाभ:-**

यापूर्वी रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचारी यांचा भविष्य निर्वाह निधी उतरविण्यात येत नव्हता, तथापि सद्यस्थितीत राज्यातील कंत्राटी कर्मचारी यांचा भविष्य निर्वाह निधी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व कामगार कायद्यातील तरतुदी लक्षात घेऊन उतरविण्यात येत आहे.

**६.कर्मचारी राज्य विमा (वैद्यकीय लाभ) :-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचारी यांचा विमा कंत्राटी सेवेच्या पहिल्या दिवसापासून उतरविण्यात आला असून सदर विमाच्या अनुषांगीक तरतुदी असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

**अ) अपंगत्व लाभ:** कर्मचारी अपंग झाल्यास, ESIC हे सुनिश्चित करते की, कर्मचाऱ्याला तात्पुरते अपंगत्व आल्यास दुखापतीच्या कालावधीसाठी किंवा कायमचे अपंगत्व आल्यास कर्मचाऱ्याच्या उर्वरित आयुष्यासाठी त्यांचे मासिक वेतन दिले जाईल.

**ब) मातृत्व लाभ:**. ESIC चा लाभ प्रसूती झाल्यापासून २६ आठवड्यांच्या कालावधीसाठी आणि गर्भपात झाल्यास ६ आठवड्यांच्या कालावधीसाठी सरासरी दैनिक वेतनाच्या एकूण १००% प्रदान करण्यात येतो व तसेच नियमानुसार मुल दत्तक घेतल्यास १२ आठवड्यांचे वेतन दिले जाते.

**c) आजारपणाचा लाभ**: ESIC योजनेच्या माध्यमातून वैद्यकीय रजेवर असलेल्या कंत्राटी कर्मचारी यांना त्यांना असलेल्या रकमेपैकी ७०% रक्कम दिली जाते. मात्र दोन लाभाच्या अंतरात जास्तीत जास्त ९१ दिवस फरक असला पाहिजे.

**७. आरोग्य विमा:** ज्या कंत्राटी कर्मचारी यांचे मासिक एकत्रित मानधन २१,०००/- रुपये आहे व जे कंत्राटी कर्मचारी राज्य विमा योजनेअंतर्गत येत नाहीत. अशा कर्मचाऱ्यांकरिता खाली नमूद केलेले आरोग्य विमा लागू करण्यात येत आहे.( कंत्राटी कर्मचारी + पत्नी/ पती + दोन मुले) खाली नमूद केलेले फायदे IRDA च्या अटी आणि शर्तींच्या अधीन आहेत.

| Sr.No. | POLICY CONDITION | CHOLA MS GEN INS |
|---|---|---|
| **1.** | Family Size | 1 + 3 |
| **2.** | Family Definition | Self + Spouse + 2 Dependent Children upto 25 years |
| **3.** | Age Band | Upto 75 Years |
| **4.** | Policy Type (Floater/Non-Floater) | Floater |
| **5.** | Sum Insured Graded | 2,00,000/- |
| **6.** | Maternity Cover | Rs.25,000/- For Normal and RS.35,000/- For CSection |
| **7.** | 9 Months waiting period for Maternity | Waived off |
| **8.** | Pre and Post Natal Expenses | Covered within Maternity sub limit. |
| **9.** | Baby Cover from Day-1 | Covered, within Family SI |
| **10.** | Pre Existing Ailments | Covered for all from day 1 |
| **11.** | Waiver of 30 days waiting period | Waived off |
| **12.** | Waiver of 1st, 2nd, 3rd & 4th Year exclusion | Waived off |
| **13.** | Domiciliary Hospitalization Cover | Not Covered |
| **14.** | Room Rental Limit | Normal Room 2% of the sum insured & ICU 4% of Sum Insured |
| **15.** | Ailment wise / procedurewise capping | No Cappimg |
| **16.** | Internal Congenital diseases | Covered |
| **17.** | GIPSA / PPN Network | Not Applicable |
| **18.** | 30 days Pre hospitalisation & 60 days Post hospitalisation expenses resp. | Covered |
| **19.** | Covid 19 | Covered |
| **20.** | Day Care treatment to be covered | Covered |
| **21.** | Corporate Buffer | Not Covered |

| | | |
|---|---|---|
| **22.** | Copay | No Copay |
| **23.** | Ambulance Charges | Covered Rs. 1000 |
| **24.** | Terrorism Cover | Covered |
| **25.** | Mid-Term addition of dependents covered in case of Newly married spouse & New born baby | Covered |
| **26.** | Addition & Deletion of Employee will be done from of Joining & Date of Leaving respectively | On Pro rata basis |
| **27.** | Cashless Facility | Available in network hospital |
| **28.** | TPA | CHOLA in house |
| **29.** | Claim Intimation | Within 7 days |
| **30.** | Claim submission clause | Within 30 days |

८. **मृत्यू विमा: (IRDA नुसार पॉलिसी कव्हरेज बदलू शकते):-**

कंत्राटी कर्मचाऱ्यांचे **कामगार भरपाई धोरण** या अनुषंगाने खालील प्रमाणे अटी व शर्ती करण्यात येत आहेत.

एखादा कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर रुजू असताना मृत्युमुखी पडल्यास त्याच्या वारसांना या योजनेअंतर्गत विमा कवच उपलब्ध करून देण्यात येत आहे सदर विमा कवच व कंत्राटी कर्मचारी यांचे वय लक्षात घेता भरपाई रक्कम ८ लाख ते २० लाख दरम्यान देय होईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०८२५१६११४२३५१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijaykumar Baburao Kalwale

Digitally signed by Vijaykumar Baburao Kalwale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d820f1240f4af7c4adf8a2bfa01f1a1b293cda8c45e21d4fcedd bd1d028049ef, serialNumber=5a9240fd6185555f5cb85c9e2df1be53c4fd17e13f93a7 acfd2cafc1b18b5939, cn=Vijaykumar Baburao Kalwale
Date: 2021.08.25 17:21:29 +05'30'

**( विजयकुमार कलवले )**
**सहायक संचालक (रोजगार हमी योजना),**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक, मे.सीएससी ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमिटेड, नवी दिल्ली .

**प्रत,**

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) आयुक्त, नरेगा, नागपुर

३) सर्व जिल्हाधिकारी.
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
५) सर्व उपआयुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय.
६) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
७) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो/ग्रा.पं.)
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
९) निवडनस्ती, रोहयो-७ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**माहितीस्तव,**

१. मा.मंत्री, रोहयो यांचे खाजगी सचिव.
२. मा.राज्यमंत्री,रोहयो यांचे खाजगी सचिव
३. मा. अपर मुख्य सचिव, रोहयो यांचे स्वीय सहाय्यक.